## वाहतूक नियंत्रण अधिसुचना

जाक्र पोउआ/वाहतूक/ 4163 /२०२१ पिंपरी चिंचवड, दिनांक२५/११/२०२१

**विषय : कार्तिक एकादशी निमित्त आळंदी येथील वाहतूक व्यवस्थेत करण्यात आलेल्या बदलांबाबत.**

----------ooo----------

श्री. संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा व कार्तिक यात्रा सोहळा दिनांक २७/११/२०२१ ते दिनांक ४/१२/२०२१ या कालावधीत आळंदी येथे संपन्न होत आहे. या सोहळ्यामध्ये महाराष्ट्र व परराज्यातून लाखो भाविक आळंदी येथे येत असतात. त्यामधील बहुसंख्य भाविक देहूगाव गाथा मंदिर व भंडारा डोंगर येथेही दर्शनासाठी जात असतात. यामध्ये वाहतुक कोंडी होऊ नये, वाहतूक सुरक्षीत व सुरळीतपणे चालणे इष्ट आहे. त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए. ०१९६/८७१/सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(ए)(बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन, मी आनंद भोईटे, पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायर ब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका इ.) खेरीज करुन आवश्यकतेनुसार दिनांक २७/११/२०१९ रोजी सकाळी ०१:०० वा. पासून ते दिनांक ४/१२/२०२१ रोजी २४.०० वा पर्यंत **श्री. संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा व कार्तिक यात्रा सोहळा** संपेपर्यंत आवश्यकतेनुसार खालीलप्रमाणे आळंदी व परिसरातील वाहतूक बंद/वळविण्यात येणार असून, त्याबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

| अक्र | वाहतुकीस बंद/वळविण्यात येणारे रस्ते | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १ | मोशी येथुन आळंदीकडे येणारी वाहने | १.जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे<br>२.भोसरी चौक- मॅगझीन चौक<br>३.मोशी-चाकण-शिक्रापुर मार्गे |
| २ | चिंबळी फाटा चौक, चाकण येथुन आळंदकडे येणारी वाहने | १.जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे<br>२.भोसरी चौक- मॅगझीन चौक |
| ३ | आळंदी फाटा चौक, चाकण येथुन आळंदीकडे | १.जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे<br>२.भोसरी चौक- मॅगझीन चौक |
| ४ | चाकण शिक्रापुर रोडवरुन वडगाव घेणंदमार्गे आळंदीकडे येणारी वाहने | कोयाली कमान, कोयाळी -मरकळगाव मार्गे |
| ५ | दिघी मॅगझीन चौकाकडुन आळंदीकडे येणारी वाहने | १.भोसरी -मोशी-चाकण मार्गे<br>२. अलंकापुरम -जयगणेश साम्राज्य चौकमार्गे |
| ६ | मरकळमार्गे आळंदीकडे येणारी वाहने | १.धानोरेफाटा –चऱ्होली फाटा-मॅगझीन चौक /अलंकापुरम चौक मार्गे |

तसेच सदर कालावधीत मंदीर परीसरात आपातकालीन परिस्थीती उद्भ्वल्यास खालील प्रमाणे **अपातकालीन मार्ग निश्चित केला आहे.**

**आपातकालीन मार्ग- माऊली मंदीर (आळंदी)- घुंडरे आळी चौक – चाकण चौक - इंद्रायणी हॉस्पीटल (आळंदी) – चाकण**

(आनंद भोईटे)
पोलीस उप-आयुक्त, परि २
अति.कार्यभार वाहतूक शाखा
पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

Scanned with CamScanner

जावक क्रमांक –

# आळंदी कार्तिकी यात्रा (वाहतुक नियोजन आराखडा)

## दिघी आळंदी वाहतुक विभाग




Scanned with CamScanner